स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भः रासेयो/२०२४–२५/ १८६** **दि.१९/०८/२०२४**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

**विषय : विविध कार्यशाळा आयोजनाकरिता ऑनलाईन प्रस्ताव पाठविणे बाबत...**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरवर्षी विविध विषयांवर आधारीत उपक्रमांचे आयोजन रासेयो संलग्न महाविद्यालयांमधून करण्यात येते. सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे विषयांवर आधारित कार्यशाळांकरिता खालीलप्रमाणे विषयांवर आधारीत एक/तीन दिवसीय कार्यशाळा/शिबिरे अयोजित करण्याकरिता महाविद्यालयांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

१. **मूल्यशिक्षण अंतर्गत कार्यशाळा** : अवयवदान, पर्यावरण, लिंगभाव संवेदनीकरण.
२. **ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना** : किल्ले संवर्धन, ऐतिहासीक स्थळे संवर्धन.
३. **युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम** : योग प्रशिक्षण कार्यशाळा, व्यसनमुक्ती, ताणतणाव व्यवस्थापन, लोक–कला (लोकसंगीत, लोकनृत्य).
४. **रासेयो शिबिरांसाठी विद्यापीठ निधी (अर्थसहाय्य)** : कौशल्य विकास, संशोधन पद्धती मार्गदर्शन, सायबर सुरक्षा.

ज्या महाविद्यालयांना वरील उपक्रमांतर्गत कार्यशाळा/शिबिरे आयोजित करावयाची आहेत अशा महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे उपक्रमांचे प्रस्ताव www.bcud.unipune.ac.in→login→menu→nsss→workshop proposal या लिंकवर ऑनलाईन स्वरूपात दि. **२७ ऑगस्ट, २०२४ पर्यंत** भरण्यात यावे. प्रस्ताव भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून स्कॅन कॉपी पीडीएफ तात्काळ स्वरूपात अपालोड करण्यात यावी.

सदर कार्यशाळांचे आयोजन नोव्हेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात यावे. त्यानुसार प्रस्तावामध्ये तपशिल सादर करणे आवश्यक आहे आणि नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणेच कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

कळावे, ही विनंती.

*टिप : प्रस्ताव क्र. १ व क्र.२ जिल्हास्तरीय, एकदिवशीय व कमाल १०० विद्यार्थी संख्या याप्रमाणे प्रस्ताव सादर करावे.*
*प्रस्ताव क्र. ३ व क्र.४ विद्यापीठ/राज्य, तिन दिवशीय व कमाल १०० विद्यार्थी संख्या याप्रमाणे प्रस्ताव सादर करावे.*

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**